admn 20-21

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२२०/ 2020

दि. २६ नोव्हेंबर,२०२०

## परिपत्रक

**विषयः- कृषी व संलग्न विद्याशाखेची पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ अंतर्गत पुढील कार्यक्रम.**

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप।शिक्षण-१/१६५९ दि. ५/१०/२०२०

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२०-२१ हया शैक्षणिक वर्षामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि. १०/९/२०२० पासून चालू करण्यात आली होती. याअंतर्गत उमेदवारांनी नियोजित वेळापत्रकानुसार दि. २१/९/२०२० पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केलेली आहेत. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.९/९/२०२० रोजी सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाच्या (एसईबीसी) आरक्षणास अंतरिम स्थगिती दिली असल्याने यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. यास्तव संदर्भीय परिपत्रकान्वये पुढील प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब, दि. २४/११/२०२० अन्वये सूचित करण्यात आलेले आहे की, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.९/९/२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी. ज्या विद्यार्थ्यांनी दि. ९/९/२०२० पूर्वी एसईबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील, परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावे. यानुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील कृषी व संलग्न अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु करण्याविषयी उपसचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय यांनी दि. २६/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

उक्त शासन निर्णय विचारात घेता, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सन २०२०-२१ हया शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेचे पुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०१/१२/२०२० (सायंकाळनंतर) |
| २. | तक्रार नोंदणीचा कालावधी | ०२/१२/२०२० ते ०५/१२/२०२० |
| ३. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०७/१२/२०२० (सायंकाळनंतर) |

admn 20-21

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| ४. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | १०/१२/२०२० (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ११/१२/२०२० ते १४/१२/२०२० (सायं. ५.३० पर्यंत) |
| ५. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | १६/१२/२०२० (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १७/१२/२०२० ते १९/१२/२०२० (सायं. ५.३० पर्यंत) |
| ६. | (i) तिसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | २१/१२/२०२० (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २२/१२/२०२० ते २४/१२/२०२० |
| ७. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | २६/१२/२०२० |
| ८. | **चौथी प्रवेश फेरी (परिशिष्ट 'जे'** येथील कार्यपध्दतीनुसार) | २८/१२/२०२० ते ३०/१२/२०२० |
| ९. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०१/२०२१ |

रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.

वरील वेळापत्रकाची सर्व उमेदवार तसेच सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

(विश्वजीत माने)
**महासंचालक**

प्रति,
१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), सर्व कृषी विद्यापीठे
२. चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदव्युत्तर महाविद्यालये.
३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड,पुणे यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे तसेच सुधारीत वेळापत्रकानुसार वेळोवेळी प्रवेश प्रक्रियाविषयक कामकाज पार पाडावे.
४. मे. मिटू स्किलोजिस्, दुसरा मजला, रत्नतारा कॉम्लेक्स, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे ४११०४७ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रत माहितीसाठीः-
१. मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
२. उपसचिव (कृषी विद्यापीठे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई